
वित्तीय साक्षरता सप्ताह

जून 4 ते 8, 2018

# जोखीम विरुध्द परतावा




काळजीपूर्वक विचार करा, कारण अपेक्षित असे उच्चतर परतावे मिळविण्यासाठी मोठी जोखीमही स्वीकारावी लागते.

### पायाभूत तत्व

वित्तीय उत्पादांमध्ये गुंतवणुक किंवा बचत करतेवेळी लक्षात ठेवायचे पायाभूत तत्व म्हणजे जोखीम आणि परतावा हयांच्यातील समतोल हे आहे. अपेक्षित उच्चतर परताव्यांमध्ये उच्चतर जोखीम आणि संभाव्य तोट्याची ही शक्यता असते.

### सुयोग्य परिश्रम (ड्यु डिलिजन्स)

अगदी थोड्या कालावधीत उच्च किंवा हमीयुक्त परताव्यांचे अमिष देऊ करणा-या अविनियमित संस्थांच्या योजनांमध्ये भाग घेण्यापूर्वी योग्य ती काळजी घेतली पाहिजे. अशा योजना फसवाफसवीच्या असू शकतात आणि तुम्ही कष्टाने मिळविलेला पैसा गोळा करुन त्या योजनेचे प्रायोजक पसार होऊ शकतात.

### सचेत पोर्टल

ठेवींची परतफेड करण्यास किंवा कोणत्याही योजनेखाली गोळा केलेल्या पैशांची परतफेड करण्यात कसुरी करणा-या संस्थेची माहिती किंवा तिच्या विरुध्दची तक्रार कळविण्यासाठी www.sachet.rbi.org.in ला भेट द्या.

### बँकेमधील ठेवी सुरक्षित आहेत का ?

बँकांमध्ये ठेवलेल्या ठेवी सुरक्षित असतात कारण बँकांवर आरबीआयचे नियंत्रण व पर्यवेक्षण असते आणि बँकिंग लोकपाल योजनेद्वारा, तक्रार निवारणाची यंत्रणाही असते.

### ठेव हमी

बँकांमधील ठेवींना, डिपॉझिट इन्शुअरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशनकडून, प्रति ग्राहक रु. एक लाखापर्यंतची हमी दिली जाते.

वित्तीय साक्षरता - समृध्दीचा मार्ग

जोखीम विरुध्द परतावा

वित्तीय समावेशन व विकास विभाग
भारतीय रिझर्व बँक
www.rbi.org.in